*Appendix IX (ix)*, **(Vide Article - 9.02 (viii))**

**वनक्षेत्र व संरक्षित क्षेत्राचे निसर्ग पर्यटन कामाची अंमलबजावणी करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : वनका-२०११/प्र.क्र.१६४/फ-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक - २४ ऑक्टोबर, २०११.

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रातील वनांच्या पर्यटन विकास व वृध्दीच्या अनुषंगाने धोरण वाढविण्याच निश्चित करण्यात आले आहे. शासन निर्णय क्रमांक वनपर्यटन-१००२/प्र.क्र.५२/फ-१, दिनांक २०फेब्रुवारी,२००८ अन्वये महाराष्ट्र राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण ठरविण्यात आले आहे.सद्य:स्थितीत राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये, व्याघ्र प्रकल्प क्षेत्र आणि वनक्षेत्रातील दुर्ग, जलस्थळे, जलप्रपात तथा आकर्षक ठिकाणे येथे पर्यटकांचा कल असल्याने, त्यांचे आहे त्या स्थितीत संवर्धन करणे अगत्याचे ठरते. त्याचबरोबर या क्षेत्रावर ज्या स्थानिक लोकांची उपजीविका अवलंबून आहे आणि त्यांना या क्षेत्राचे संवर्धन व संरक्षण करणे आवश्यक वाटले पाहिजे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणे. या बाबी देखील तेवढ्याच महत्वाच्या आहेत. यास्तव, पर्यावरणाचा कोणताही ऱ्हास न होता निसर्ग पर्यटनाचा विकास, स्थानिक लोकांच्या संस्कृतीचे जतन, या बाबी विचारात घेऊन पर्यटक आणि स्थानिक नागरिक या दोघांनाही लाभप्रद होण्याकरिता वरील दिनांक २० फेब्रुवारी, २००८ च्या शासन निर्णयान्वये निसर्ग पर्यटनाचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

**शासन निर्णय:**

वनक्षेत्रातील पर्यटकांवर प्रभावी नियमन नसल्याकारणाने तेथील जैवविविधता, वन्यजीव, पाणस्थळे, इत्यादि ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जैविक / अजैविक कचरा, प्रदुषण होऊन या स्थळांचा ऱ्हास होत आहे. त्याचबरोबर स्थानिक ग्रामस्थ यांचीही या वनस्थळांकडे पाहण्याची दृष्टी फारशी समाधानकारक नाही. यामुळे वनक्षेत्र तथा संरक्षित क्षेत्राबाबतच्या गावात अनुक्रमे संयुक्त वन व्यवस्थापन समिती तथा परिस्थिती विकास समिती यांना बळकटी देण्यात आली असून त्यामध्ये नैसर्गिक वारसा आणि स्थानिक जनतेचे हितसंबंध ठेवणे, यादृष्टीने योग्य अशा कामांचे नियोजन करण्याकरिता विषय तज्ज्ञ सल्लागाराची सेवा घेणे आवश्यक आहे. या सल्लागारांच्या मदतीने पर्यटन स्थळी निसर्गाशी सुसंगत विकास कामे व त्यांचे अंदाजपत्रक आणि कामाच्या अंमलबजावणीवर देखरेख करणे अपेक्षित आहे. ही कामे त्या परिसरातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती तथा परिस्थिती विकास समिती यांचे माध्यमातून राबविल्यास स्थानिक जनतेत या पर्यटन स्थळांविषयी आपुलकी निर्माण होईल आणि त्यांचा क्षेत्र संवर्धनाचा व्यासंग वाढीस लागेल. हा उपक्रम राबविण्याकरिता वन विकास महामंडळ आणि वने / वन्यजीव विभाग यांनी त्यादृष्टीने प्राधान्यक्रम ठरवावयाचा आहे. निसर्ग पर्यटन कामाकरिता नियतव्यय उपलब्ध झाला असून या निधीचा वापर करण्यासंदर्भात खालील ठळक बाबी विचारात घेण्यात याव्यात.

१) **वन विभागाकडील विश्रामगृहांचे वन विकास महामंडळाकडे हस्तांतरण करणे.**

वनक्षेत्र तथा संरक्षित क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यावर कडक निर्बंध आहेत. मात्र, वन विभागाकडे जुन्या विश्रामगृहांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. यापैकी बरीच विश्रामगृहे आणि तत्सम इमारती वन व्यवस्थापनासाठी सद्य:स्थितीत उपयोगात आणली जात नसल्याने त्याचा वापर निसर्ग पर्यटनाप्रित्यर्थ

करण्यास वाव आहे. सदरची सर्व विश्रामगृहे व तत्सम इमारती वन विकास महामंडळाने मागणी केल्यास, त्या तात्काळ त्यांना हस्तांतरण करण्यात याव्यात आणि उर्वरीत विश्रामगृहे व तत्सम इमारती वने / वन्यजीव विभागाने निसर्ग पर्यटन विकास कामांकरिता वापर करण्यात यावा.

२) **<u>गृहपर्यटन विकास (Home Stead Basis) करणे.</u>**

स्थानिक गावकरी पश्चात्य पध्दतीने शौचालय व स्नानघर तयार करुन त्यांचे घरी किंवा शेती क्षेत्रात बुश कॅम्पच्या धर्तीवर पर्यटकांना योग्य मोबदला घेऊन अतिरिक्त निवासस्थान किंवा राहूटी उपलब्ध करुन देऊ शकतील. त्याचबरोबर पर्यटकांकरिता निसर्ग मार्गदर्शक म्हणून काम करु शकतील. यामुळे पर्यटकांना स्थानिक संस्कृतीची जवळून माहिती प्राप्त होवू शकेल आणि त्यायोगे स्थानिक लोकांना आर्थिक लाभ मिळेल. याकरिता आदिवासी विकास विभागाच्या सहाय्याने आदरातिथ्य व्यवस्थापन, पर्यटन विभागाचे सहाय्याने मार्गदर्शक प्रशिक्षण स्थानिक युवकांना देण्यात यावे. अशा रितीने विकसित करावयाच्या पर्यटक निवासाबाबत स्थानिक घर तथा शेतमालकांसोबत करारनामा करुन घेणे आवश्यक राहील. या करारनाम्यात घरामध्ये पर्यटकांच्या आवडीनुसार सुधारणा करणे, शौचालय, एल.पी.जी. गॅस, स्वयंपाकगृह, पिण्याचे पाणी, सौरउर्जेची उपकरणे, सेंद्रीय कचऱ्याची विल्हेवाट / पुनर्वापर, रुट झोन तथा फायटोराईड (Phytoride) तंत्रज्ञाचा वापर, इत्यादि कामे पर्यटन निधीतून उभारणी करण्याचा अंतर्भाव असावा की ज्यायोगे ही व्यवस्था इकोफ्रेंडली राहील.

३) **<u>पर्यटन स्थळांची निवड आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सेवा उपलब्ध करणे.</u>**

निसर्ग पर्यटनाचे जाळे विकसित करतांना संरक्षित क्षेत्रे, जैवविविधता असलेली वनसंपदा क्षेत्रे, पाणस्थळे, जलप्रपात, दुर्ग, गिरीस्थाने यास प्राधान्य देण्यात यावे. या स्थळाजवळील यशस्वी संयुक्त वन व्यवस्थापनेची कामे, रोपवन क्षेत्रे, रोपवाटीका, प्रिझर्वेशन प्लॉट, धार्मिक ठिकाणे व आदिवासी क्षेत्रातील सांस्कृतिक विविधता, या बाबींचा देखील अंतर्भाव पर्यटकांचे पसंतीनुसार ठरविण्यात यावा. यामध्ये स्थानिक रहिवासी पर्यटकांना मार्गदर्शक, सामान वाहक आणि पर्यटकांना सहाय्यक ही कामे करु शकतील त्याचप्रमाणे हस्तकला, वनौषधी व तत्सम स्थानिक कलाविष्कार सादर करु शकतील. सदरहू स्थानिक रहिवाश्यांना या उपक्रमात सहभागी होण्याकरिता पर्यटन विकास आणि आदिवासी विकास विभागाचे सहकार्याने आदरातिथ्य व्यवस्थापन या विषयावरील प्रशिक्षण देण्यात यावे. गरज भासल्यास, या कामाकरिता देखील पर्यटन योजनेतील निधीचा वापर करण्यात यावा. या कामी योग्य ग्रामस्थ निवड करताना संयुक्त वन व्यवस्थापन समिती / परिस्थिती विकास समिती यांची संमती अनिवार्य असेल. या स्थानिक ग्रामस्थांना या कामाचा मोबदला समितीने निश्चित करुन तो पर्यटकांकडून अदा करणेकामी वने / वन्यजीव विभाग तथा वन विकास महामंडळाने पुढाकार घेण्यात यावा.

४) **<u>पर्यटन विविधता उपक्रमांचा अंतर्भाव करणे.</u>**

निसर्ग पर्यटन उपक्रम राबवितांना व्यावसायिक तथा कुटुंब संस्थेतील समुह, विद्यार्थी समुह, वन्य जीव प्रेमींचा समुह, साहसी पर्यटकांचा समुह, विदेशी पर्यटकांचा समुह, केवळ एक दिवसाकरता येणारे पर्यटक समुह, अशी वेगवेगळी पॅकेजेस तयार असावीत. या विभिन्न पर्यटक समुहाकरिता त्यांना लागणाऱ्या सोयी सवलती उपलब्ध करुन दिल्यास, समाजातील सर्वच स्तरांवरील लोक या उपक्रमाचा लाभ घेवू शकतील. अशा समुह पर्यटकांना आयोजित करणाऱ्या संस्थेसमवेत "मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडींग" (Memorandum of Understanding) करण्यात यावे. त्याचप्रमाणे विभिन्न पर्यटन समुह संकल्पना राबवितांना भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ आणि वनसंवर्धन अधिनियम,१९८० मधील तरतुदींना बाधा येणार नाही, याची कटाक्षाने नोंद घेण्यात यावी. साहसी पर्यटक समुह उपक्रमाकरिता अनुभवी अॅडव्हेंचर टुरिस्ट ग्रुप (Adventure Tourist Group) सोबत करारनामा

करुन, वन विभागाचे पर्यटन क्षेत्रात येणाऱ्या पर्यटकांना "साहसी पर्यटन पॅकेज" देण्यात यावे.तसेच विद्यार्थी समुहाकरिता विशेष सवलत देण्याचा विचार करण्यात यावा.

५) **<u>जलस्थळ वैशिष्ट पर्यटन उपक्रम राबविणे.</u>**

निसर्ग पर्यटनाची बहुसंख्य ठिकाणे मोठ्या जलस्थानाजवळआहेत. उदा. नवेगाव, पेंच किंवा तत्सम जलसाठे असणारे क्षेत्रात नौकाविहार, विंड सर्फींग, पॅराग्लायडींग, पक्षी / प्राणी निरीक्षण, इत्यादि विविध कार्यवाहींचा विचार करण्यात यावा.

६) **<u>खाजगी सहल व्यवस्थापकांचा सहभाग घेणे.</u>**

खाजगी सहल व्यवस्थापकांनी त्यांचेकडील पर्यटकांना निसर्ग पर्यटनास येण्याकरिता चालना देण्यात यावी. यामध्ये यात्रा व्यवस्थापक, हॉटेल मालक यांनाही सहभागी करुन घेण्यात यावे. निसर्ग पर्यटनांतर्गत स्थानिक स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या सुविधा आणि खाजगी सहल व्यवस्थापक यामध्ये समन्वय साधून जास्तीत जास्त पर्यटकांना उत्कृष्ट सेवा देण्याविषयी संयुक्त वन व्यवस्थापन / परिस्थिती विकास समिती, वने / वन्यजीव विभाग आणि वन विकास महामंडळ यांनी एकत्रितपणे प्रयत्नशील व्हावे.याकरिता अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा, बैठका आयोजित करून यामध्ये आवश्यक माहिती व प्राविण्य प्राप्त करावे.

७) **<u>निसर्ग पर्यटकांना पोहोच सुविधा उपलब्ध करणे.</u>**

निसर्ग पर्यटनाची बहुतांश ठिकाणे बस / रेल्वे / विमानतळ यापासून दूर अंतरावर असल्याने भेट देणाऱ्या पर्यटकांना इच्छित स्थळी विनाविलंब पोहचविण्याकरिता खाजगी सहल व्यवस्थापक किंवा स्थानिक ग्रामस्थांच्या माध्यमातून वाहतूक सुविधा उपलब्ध करण्यात यावी.याचा अंतर्भाव सहल पॅकेजमध्ये केल्यास, स्थानिकांना अर्थार्जनाचे साधन निर्माण होवू शकेल आणि पर्यटकांचा वेळ वाचून अल्पावधीत त्यास पर्यटनाचा आनंद उपभोगता येईल.

८) **<u>निसर्ग पर्यटनाचा विस्तार आणि प्रसिध्दी करणे.</u>**

वरील पार्श्वभूमी विचारात घेवून विकसित करण्यात आलेल्या पर्यटनाचा व्यापक प्रचार होण्याकरिता प्रत्येक पर्यटन स्थळाची घडी-पत्रिका व तत्सम प्रसिध्दी साहित्य तयार करण्यात यावे. वन विकास महामंडळाने या निसर्ग पर्यटन उपक्रमाकरिता एक आकर्षक संकेत स्थळ विकसित करुन त्यामध्ये वने / वन्यजीव आणि वन विकास महामंडळाकडील पर्यटन स्थळांचा अंतर्भाव करावा. यामध्ये ऑनलाईन भेट आरक्षण आणि शुल्क स्वीकारण्याची सुविधा असावी. या संकेत स्थळाची जोडणी (Link) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या संकेत स्थळाशी करण्यात यावी. त्याचप्रमाणे पर्यटकांची त्यांच्या भेटीनंतरची प्रतिक्रिया / अभिप्राय वेळोवेळ प्राप्त होणेकरिता सॉफ्टवेअर विकसित करण्यात यावे.

९) **<u>राज्यस्तरीय समन्वय समिती गठीत करणे.</u>**

राज्य स्तरावर निसर्ग पर्यटनासंबंधी धोरणात्मक निर्णय, पर्यटन स्थळांची निश्चिती व संबंधित विभाग / यंत्रणांमध्ये समन्वय याकरिता अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (वने) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती निर्माण करण्यात येत आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ,व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर व व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (MSRTC) हे समितीचे सदस्य व अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्यजीव प्रशासन) हे समितीचे निमंत्रक म्हणून कार्य करतील.

१०) **वने / वन्यजीव विभाग आणि वन विकास महामंडळ यांच्या कामाचा प्राथम्यक्रम ठरविणे.**

निवडलेल्या निसर्ग पर्यटन स्थळांच्या प्रकल्प आराखड्यांमध्ये वन क्षेत्रातील तत्सम विकास कामांचा व वृक्षलागवड कामांचा समावेश संबंधित वन विभाग / वन्यजीव विभागांच्या कार्ययोजनेत / व्यवस्थापन आराखड्यात प्राधान्याने करण्याची जबाबदारी वन विभागाची राहील. तसेच संरक्षित क्षेत्रातील पर्यटन कार्यविधीमध्ये एफ.डी.सी.एम. लिमिटेड यांना प्राधान्य देणे व त्यासाठी एफ.डी.सी.एम.लिमिटेड यांच्या वाहनांसाठी प्राथमिकता निश्चित करण्याबाबत वन विभागाद्वारे आवश्यक ती काळजी घेण्यात यावी.

११) **वन विकास महामंडळाचे कामाकरिता दीर्घ कालावधीची विशेष तरतूद करणे.**

प्रकल्प प्रशासनावर होणारा खर्च हा एकूण प्रकल्प किंमतीचा भाग म्हणून राहील. तसेच प्रकल्पांतर्गत निर्मित स्थायी सोयी-सुविधांच्या पुढील १५ वर्ष कालावधीतील परिरक्षणाची जबाबदारी वन विकास महामंडळाची राहील.

राज्यातील संरक्षित क्षेत्रे व त्याभोवती तसेच इतर आकर्षक वनक्षेत्रातील शासनाच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००८ च्या धोरणाप्रमाणे निसर्ग पर्यटन स्थळांची निश्चिती करण्यात यावी. त्यानुसार प्रत्येक पर्यटन स्थळांकरिता विकास आराखडा तयार करण्यात यावा. पर्यटन स्थळ विकास हे वन विभागाकडील वैशिष्ट्यपूर्ण काम असून, त्यासाठी स्वतंत्र मापदंड नाहीत. वास्तव, प्रत्येक पर्यटन स्थळाचा आराखडा सदर क्षेत्रासाठी असलेल्या व्यवस्थापन आराखडा / व्याघ्र संवर्धन आराखडा किंवा कार्य आयोजना, यामधील तरतुदी तपासून करण्यात यावा. त्याचबरोबर यामधील कामांची अंमलबजावणी करताना भारतीय वन अधिनियम,१९२७, वन संवर्धन अधिनियम, १९८० किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ यातील तरतुदींचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

या आराखड्यात नकाशा, डिझाईन, बांधकामाची अवस्था-१ ची अंदाजपत्रके व इतर कामांची अंदाजपत्रके यांचा अंतर्भाव असावा. सर्वसाधारणपणे वने आणि वन्यजीव क्षेत्रातील निसर्ग पर्यटन विकासाची कामे करण्याकरिता सुयोग्य कर्मचारीवृंद उपलब्ध नाही. वास्तव,अशी कामे करण्याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा परिस्थिती विकास समिती यांना प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे अशा स्थळांपैकी निवडक स्थळे वन विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात यावीत आणि उर्वरित स्थळे संबंधित वने आणि वन्यजीव विभागाने पर्यटनाकरिता विकसित करावीत. निसर्ग पर्यटन व्यवस्थापनाद्वारे वन विकास महामंडळास होणाऱ्या निव्वळ नफ्यातून २० टक्के रक्कम संबंधित वन विभागास देण्यात यावी. वन विभागाकडे प्राप्त होणाऱ्या या निधीतून निम्मी रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा परिस्थिती विकास समिती यांना देण्यात यावी आणि उर्वरित रक्कम व्याघ्र प्रकल्प क्षेत्र असल्यास, व्याघ्र प्रतिष्ठानास सुपूर्द करण्यात यावी. अन्यथा शासनाकडे जमा करावी. संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा परिस्थिती विकास समितीने या निधीचा वापर सुधारित पाळीव पशुधन, एल.पी.जी.गॅस यासारख्या वनावरील अवलंबत्व कमी करणाऱ्या कार्यबाबींकरिता वापरण्यात यावा.

- निसर्ग पर्यटन क्षेत्रात चारा क्षेत्राचा विकास (meadow development) निरीक्षण मनोरे, मचाण, पाणस्थळांचा विकास (waterhole development), क्षार चाटण, कुरण विकास,निसर्ग पथ विकास, सौर ऊर्जेवर आधारित कुंपण, माहिती फलक, इत्यादींचा आणि प्रेक्षणीय स्थळांचा विकास, या बाबींसह आश्रयस्थळांच्या विकासाची कामे.

- इको-फ्रेंडली सुविधा, गृह पर्यटन सुविधा (Home Stead Basis) निर्माण करणे.
- पर्यटकांचे नियमन करण्याकरिता प्रवेशद्वार, बॅरीअर, क्लोज सर्कीट कॅमेरा, इत्यादी सोयी.
- प्रसिद्धी विषयक सामग्री - माहिती पत्रके, घडीपत्रके, दृकश्राव्य सामग्री, इत्यादी तयार करणे.
- पर्यटन सुविधा अंतर्गत वन विश्रामगृहे व तत्सम इमारतींची सुधारणा आणि व्यवस्थापन, इको- फ्रेंडली स्वच्छतागृहे, घनकचरा व्यवस्थापन, मुक्कामाच्या जागा, पिण्याचे पाणी, इत्यादी तयार करणे.
- पर्यटन स्थळांचे संकल्पचित्र व तत्सम प्रदर्शनी सामग्री तयार करणे.
- स्थानिक जनता, कर्मचारी, मार्गदर्शक, खाजगी सहल व्यवस्थापक व आदरातिथ्य सेवा या संदर्भात प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
- निसर्गप्रेमी, कुटुंब पर्यटक, विद्यार्थी आणि व्यक्ती यांच्याकरिता स्वतंत्र सहल पॅकेज कार्यक्रम आखणे.
- स्थानिक संस्कृती व हस्तकला यांना प्रोत्साहन देणे.

निसर्ग पर्यटन आराखडा तयार करण्यासाठी तज्ञ सल्लागारांची मदत घेण्यात यावी. सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी TOR (Terms of References) तयार करण्यात यावे व त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. या TOR (Terms of References) प्रमाणे सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) | अध्यक्ष |
| अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) | सदस्य |
| अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर. | सदस्य |
| मुख्य महाव्यवस्थापक, एफ.डी.सी.एम. लिमिटेड, नागपूर | सदस्य |
| वन अभियंता, महाराष्ट्र राज्य, नागपूर. | सदस्य |
| सह-संचालक, लेखा व कोषागारे, नागपूर. | निमंत्रित सदस्य |
| अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (निसर्ग पर्यटन व वन्य जीव प्रशासन) | सदस्य-सचिव |

या समितीस **"निसर्ग पर्यटन तज्ञ समिती"** असे संबोधण्यात यावे.

सल्लागारांनी तयार केलेल्या निसर्ग पर्यटन आराखड्यास या शासन निर्णयातील निकष विचारात घेवून उपरोक्त समितीने मंजूरी प्रदान करावी. या मान्यताप्राप्त आराखड्याच्या आधारे कामाची अंमलबजावणी करण्याकरिता वन विकास महामंडळाचे उद्दिष्टांसाठी त्यांनी महामंडळाकडील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

वने आणि वन्यजीव शाखेतील करावयाच्या कामांचे विस्तृत अंदाजपत्रक तयार करणे, निविदा दस्तऐवज तयार करुन निविदा मागविणे व प्राप्त निविदांची छाननी करुन कंत्राटदारांची निवड करणे. तसेच रुपये **एक कोटींपर्यंतच्या** कामासाठी कंत्राटदाराची नियुक्ती व निविदाप्रमाणे कामे व त्यावरील खर्च मंजूर करण्यासाठी वर नमूद समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील कार्यबाबींची अंमलबजावणी मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, व्याघ्र प्रकल्प करीत असल्यास, रुपये ५० लक्ष पर्यंतचे कामांना मंजूरी देण्याचे प्राधिकार मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक यांना राहतील आणि त्यावरील खर्चाच्या कार्यबाबींकरिता उपरोक्त समितीची मान्यता घेणे अनिवार्य राहील. **रुपये एक कोटींपेक्षा** वरील रक्कमेच्या कामासाठी शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

सर्वसाधारणपणे वनक्षेत्रातील पाणस्थळे, जलप्रपात, दुर्ग व तत्सम प्रेक्षणिय स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांचे नियमन स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती किंवा संरक्षित क्षेत्रातील परिस्थिती विकास समिती यांच्यातर्फे करण्यात यावे. अशा समित्यांना आर्थिक सहाय्य करण्याच्या दृष्टीकोनातून अशा क्षेत्रातून निसर्ग पर्यटन व्यवस्थापनाद्वारे वन विकास महामंडळास होणाऱ्या निव्वळ नफ्यापैकी २० % निधी यापूर्वी स्पष्ट करण्यात आल्यानुसार समिती, व्याघ्र प्रतिष्ठान आणि शासनास द्यावयाचा आहे.

वरील तत्वांचा विचार करुन शासनाकडून अर्थसंकल्पित निधीतून आवश्यक ती तरतूद उपलब्ध केली जाईल. त्यानुसार सविस्तर प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांनी प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) आणि व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सी.एम. लिमिटेड यांजकडून प्राप्त करुन शासनास सादर करण्यात यावा. अशा रितीने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या आधारे निधी संवितरणाची कार्यवाही आयोजण्यात येईल. या व्यतिरिक्त वन विकास महामंडळाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळासमवेत सामंजस्य करार समयलेख (MOU) केला असून, त्यांचेकडूनही त्यांना वेगळा निधी उपलब्ध होणार आहे. या निधीमधून देखील वन विकास महामंडळाने वर नमूद केलेल्या वैशिष्ट्यानुसारच निसर्ग पर्यटनाच्या कामाची अंमलबजावणी केली जाईल, याची दक्षता घेण्यात यावी.

वनक्षेत्रातील पर्यटन स्थळांवरील वनक्षेत्रासंबंधीच्या दैनंदिन अडचणी सोडविण्याकरिता प्रकल्प स्तरावर उप वनसंरक्षक / वनसंरक्षक / मुख्य वनसंरक्षक यांचे अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती राहील. सदर समितीची संरचना प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) हे निश्चित करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०२५१८०२०६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( भा. रा. खैरे)**
सह सचिव (वने )
महसूल व वन विभाग

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव.
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव

मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
मा. प्रधान सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई-३२
मा. प्रधान सचिव (पर्यटन) मंत्रालय. मुंबई-३२
सचिव, ले. व को. वित्त विभाग,
महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य. नागपूर
महालेखापाल-१ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-२ ( लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य. नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख ), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य, नागपूर,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई सेंट्रल, मुंबई
सर्व अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
उप संचालक, लेखा व कोषागारे, नवी मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (विनियम),अर्थ-६,व्यय-१०, मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
वन विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती फ-५